# प्रेसनोट

उल्हासनगर शहरात निर्माण झालेले खड्डे भरणेकरिता बृहमुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका व कल्याण महानगरपालिका ज्याप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानाचा (Mobile Asphalt Mastic Mixer) वापर केला जातो त्याच आधरावर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उल्हासनगर महानगरपालिकाद्वारे धोबी घाट, येथे खड्डे भरण्याचे कामास सुरुवात करण्यात आली असून त्याच तंत्रज्ञानाचा वापर करुन नेताजी चौक, उल्हासनगर ५ या ठिकाणी खड्डे भरण्याचे काम सुरु केले आहे. त्या कामाची पाहणी आज दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजी महापालिका मा. प्रशासक तथा आयुक्त डॉ.अझीझ शेख यांनी केली. तसेच हेच आधुनिक तंत्रज्ञान वापरुन छत्रपती शाहू उड्डाण पूल, चालीया चौक, श्रीराम चौक, धोबी घाट रस्ता व शहाड रस्ता दोन्ही बाजूस खड्डे भरण्यात येतील.

सदर पहाणी करतांना संबंधित अभियंता व ठेकेदार यांना रस्त्यांचे खड्डे दिर्घकाळ टिकून राहतील असे लक्ष द्यावे अशा सूचना दिल्या. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. तरूण सेवकानी, तसेच संबधीत ठेकेदार व जनसंपर्क अधिकारी श्रीम. छाया डांगळे उपस्थित होते.

(छाया डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
३) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
४) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.